दहशतवाद-विरोधी आणि संघटित गुन्हेगारी रोखण्याबाबत भारत-इटली संयुक्त कार्यगटाची 6वी बैठक आणि दहशतवादाला मिळणारा वित्तपुरवठा रोखण्याबाबत भारत-इटली स्थायी कृती दलाची 2री बैठक

दहशतवाद-विरोधी आणि संघटित गुन्हेगारीवरील भारत-इटली संयुक्त कार्यगटाची (जेडब्लूजी) 6वी बैठक 06 ऑक्टोबर 2026 रोजी नवी दिल्ली येथे पार पडली. तसेच दहशतवाद वित्तपुरवठा प्रतिबंधावरील भारत-इटली स्थायी कृती दलाची 2 री बैठक 07 ऑक्टोबर 2026 रोजी नवी दिल्लीत आयोजित करण्यात आली होती. या बैठकांचे सह-अध्यक्षपद भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव (दहशतवाद-विरोधी) डॉ. सुहेल एजाज खान आणि इटलीच्या परराष्ट्र व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य मंत्रालयातील राजकीय व्यवहार व आंतरराष्ट्रीय सुरक्षा महासंचालनालयाचे जी7-जी20, आंतरराष्ट्रीय धोके आणि एकात्मिक धोरणाचे सहसचिव श्री पाओलो मारी यांनी भूषव. दोन्ही देशांच्या दहशतवाद-विरोधी यंत्रणांनी या बैठकांमध्ये सहभाग घेतला.

2. सीमापार दहशतवादासह त्याच्या सर्व स्वरूपातील आणि प्रकारांतील दहशतवादाचा निषेध करताना, उभय बाजूंनी 22 एप्रिल 2025 रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याचा आपला निषेध पुन्हा एकदा व्यक्त केला.

3. या दोन दिवसांत दोन्ही बाजूंनी अमली पदार्थांची तस्करी आणि उद्भवणारे प्रादेशिक व जागतिक दहशतवादी धोके यांसह दहशतवाद-विरोधी आणि संघटित गुन्हेगारी क्षेत्रातील सहकार्याच्या व्यापक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. दहशतवादी कारवायांसाठी माहिती, संप्रेषण आणि वित्तीय तंत्रज्ञानासह नवीन व उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा होणारा गैरवापर प्रभावीपणे रोखण्यासाठी सहकार्य बळकट करण्याच्या गरजेचा पुनरुच्चार करताना, दोन्ही पक्षांनी उदयोन्मुख आणि बिगर-पारंपरिक धोक्यांचा सामना करण्यासाठी क्षमता बांधणी व माहितीची देवाणघेवाण अधिक मजबूत करण्याच्या उपायांवर चर्चा केली.

4. स्थायी कृती दलाच्या बैठकीत दहशतवाद वित्तपुरवठा प्रतिबंधावरील भारत-इटली संयुक्त उपक्रमाअंतर्गत सहकार्य बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले; हा उपक्रम दोन्ही देशांच्या पंतप्रधानांनी नोव्हेंबर 2025 मध्ये जोहान्सबर्ग येथे जी-20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर सुरू केला होता. संयुक्त राष्ट्र, जीसीटीएफ आणि एफएटीएफ यांसह बहुपक्षीय मंचांवर दहशतवाद-विरोधी सहकार्य वाढवण्यावरही उभय बाजूंनी चर्चा केली.

5. संयुक्त कार्यगटाची आणि स्थायी कृती दलाची पुढील बैठक परस्पर सोयीच्या तारखांना रोम, इटली येथे आयोजित करण्याचे दोन्ही बाजूंनी मान्य केले.

नवी दिल्ली

07 ऑक्टोबर 2026